जळगाव : वाढता ए.सी. फ्रीज चा वापर ओझोन थराला घातक असून त्यावर मर्यादा आली पाहिजे असे मत प्रा. के.पी.दांडगे यांनी केले.

मु.जे. महाविद्यालयातील भूगोल विभाग व पर्यावरणशास्र विभागाच्या वतीने जागतिक ओझोन दिनाच्या निमित्ताने आयोजित ओझोनक्षय जनजागृतीपर पोस्टर स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील पर्यावरण विभागाचे सहयोगी प्रा. के.पी.दांडगे बोलत होते.कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी उपप्राचार्य डॉ.सुरेश तायडे व विभाग प्रमुख डॉ.सौ प्रज्ञा जंगले ,प्रा.किरण पवार उपस्थित होते. १६ सप्टेंबर हा जागतिक ओझोन दिवस म्हणून साजरा होत असतो त्या निमित्ताने ओझोनक्षय जनजागृतीपर अंतरमहविद्यालयीन पोस्टर स्पर्धेचे आयोजन मू. जे. महाविद्यालयात करण्यात आले होते.

मान्यवरांच्या हस्ते कार्यक्रमाचे उदघाटन करण्यात आले. याप्रसंगी प्रा. के.पी.दांडगे यांनी ओझोनवायूचा थर सूर्यापासून येणाऱ्या अतिनील किरणांपासून संपूर्ण जीवसृष्टीचे कसे रक्षण करतो परंतु वाढता ए.सी. फ्रीज चा वापर ओझोन थराला कसा घातक ठरत आहे याचे ओघवत्या शैलीत विवेचन केले. उपप्राचार्य डॉ.सुरेश तायडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक भूगोल विभागाच्या विभाग प्रमुख डॉ. प्रज्ञा जंगले यांनी तर सूत्र संचालन व आभार प्रदर्शन प्रा. सहदेव जाधव यांनी केले. स्पर्धेमध्ये विविध महाविद्यालयातील एकूण ७० स्पर्धक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. स्पर्धेत प्रथम पारितोषिक यज्ञनेश बाऊस्कर, सोनाली ठाकरे, ,द्वितीय नम्रता पाटील, किरण रुळे, तृतीय प्राची खैरनार आणि उत्तेजनार्थ रुचिका पाटील, विकेश पावरा यांनी पटकावले. कार्यक्रमाच्या यशस्विते साठी प्रा.गुलाब तडवी ,प्रा. भारत महाजन,प्रा श्रीकांत सपकाळे,प्रा.पूजा पाटील,श्री. किरण अत्तरदे आणि प्रविण पाटील यांनी परिश्रम घेतले.

प्रती,
संपादक .
दै………………..,
जळगाव.

विषय: कृपया आपल्या दैनिकातून सदर बातमीस प्रसिद्धी द्यावी ही विनंती.

प्रा.विश्वजीत चौधरी

**प्रसिद्धी समिती चेअरमन**

**९४२०३८३७७८**


OZONE
NOT JUST A LAYER,
BUT A PROTECTOR.


Moolji Jaitha College, Jalgaon
Poster Competition on Occasion of
"World Ozone Day 2017"
Organized by
Department of Environmental Science &
Geography